Equip & Grow
मुले महत्वपूर्ण आहेत

# नाटकाचे सुगावे

रविवार शाळा
CBI
चिल्ड्रन्स् बायबल इन्व्हेस्टीगेशन मुलांचा

# नाटकाचे सुगावे

## शिक्षकांसाठी पुस्तिका

## नाटक 1

निवेदकःही काल्पनिक कथा आहे परंतू काही नाव व जागेची नावे जे निष्पाप, त्यांच्या सुरक्षिततेसाठी बदलण्यात आले आहेत.
शिपाईः प्रिये तु विश्वास ठेवणार नाही त्या दिवशी मी फार भयंकर रित्या जीवंत असा बाहेर पाडलो!
पत्नीः मी तुम्हाला सांगितले होते की तिथे जावू नका परंतू तुम्ही ऐकले नाही.
शिपाईः होय तू बरोबर होतीस, परंतू जर तुम्ही तिथे गेले नाही तर जे घडत होते ते तुम्हाला कळले नसते.
पत्नीः माझ्या वडीलांची तलवार कुठे आहे?
शिपाईः हळू आवाजात, मी ती इफेस दामीमच्या छावणीत ठेवीली.
पत्नीः हे बरे केले शिपाई तुम्ही लगेच शारीयाम रस्त्याकडे जा आणि ती परत घेऊन या.
शिपाईः मी जावू शकत नाही ते मला मारून टाकतील.
पत्नीः जर तुम्ही गेले नाही तर इथेही तुम्ही सुरक्षीत दिसणार नाही.
शिपाईः मला माहीत आहे की तुला राग आला आहे, परंतू मी तुझ्या वडीलांची तलवार आणण्यासाठी जाणार नाही.
पत्नीः तुम्ही त्या मोठया माणसाला किंवा त्याच्या मोठया भावाला सोबत का नेत नाही?
शिपाईः मी नाही नेऊ शकत. कारण त्याचा भाऊ मेला आहे. आम्ही हारलो आहे.
पत्नीः (हातातील भांडे खाली पाडते), ते तुटतं आणि पिठ जमीनीवर सर्वत्र पसरतं. काय झाले?
शिपाईः मी तुला सांगितले हे सर्व विचीत्र होते. आम्ही इफेस, सूको जवळ तळ दिला होता. आम्ही त्यांना घेरून टाकले होते आणि बिथ चा मोठा भाऊ रोज जाऊन त्यांना घाबरवत असे व त्यांची थट्टा करून रोज त्यांना लढण्यासाठी आव्हान करित असे.हे इतकं हस्यास्पद होते की आम्ही लढाईची वस्त्र ही घालत नव्हतो, आम्ही फक्त बाहेर जाऊन तो त्यांची थट्टा कशी करतो हे पाहत होतो.मी तुझ्या वडीलांची तलवार तंबूत ठेवली जेणे करून ती हरवणार नाही.
पत्नीः तंबूत? तुम्ही तंबू तरी परत आणला का?
शिपाईः नाही.
पत्नीः नाही? मग हया वर्षी आपण बाहेर जाण्यासाठी काय वापरणार आहे?
शिपाईः आता कोणाच कडे तंबू किंवा तलवार नाही, मी नशीबवान आहे की मी लवकर पळालो आनंद आहे की मी घरी तरी पोहचलो, बरेच पोहचले सुध्दा नाही.
पत्नीः घरी तुमचे स्वागत आहे. आपण कसे बसे पूढे जावू. मला तुमची आठवण येत होती.
शिपाईः मला सुध्दा तुझी आठवण येत होती.

## नाटक 2

निवेदकःही काल्पनिक कथा आहे परंतू काही नाव व जागेची नावे जे निष्पाप त्यांच्या सुरक्षिततेसाठी बदलण्यात आले आहेत.
गुप्तहेरः पावलांच्या ठस्यांचे चित्र आणा, हे पाच हया आकडयासारखे दिसते.
तत्रज्ञः ठिक आहे, माझ्याकडे माणसांच्या ठस्याचे 2 प्रति आहेत. असे दिसते की ते धावत होते.
गुप्तहेरः आणि आपल्याकडे बूटांचे ठसे आहेत, असे दिसते की ते नजर ठेवत होते, पहा त्यांनी किती धूळ साठविली आहे.
तंत्रज्ञः हे फार लहान दिसतात, ते 2 स्त्रीया, कदाचीत 3 मध्यम बांध्याच्या असतील.
गुप्तहेरः पाहतो आणि आणखी एक ठसा त्याला दिसतो. हयाच्या बद्दल काय हा ठासा तर फार मोठा दिसतो ते इथून सुरू होतो (आजू बाजूला पाहतो)इथून आजू बाजूला तंत्रज्ञ???
तंत्रज्ञः हो? (कॅमेरातून वर पाहत)

## नाटक 2

गुप्तहेरः मी तुला गुन्हयाची जागा दुषित करण्याबद्दल काय सांगितले होते?
तंत्रज्ञः हे की जर मी पुन्हा तसे केले तर मला कामावरून काढून टाकण्यात येईल?
गुप्तहेरः तू अजून इथे काम केले का?
तंत्रज्ञः नाही.
गुप्तहेरः नीट विचार कर, तू इथे चाललास का, इथे पाहीलं का किंवा तू इथल्या धूळीसंबंधी विचार केला का?
तंत्रज्ञः नाही मी खरच सांगतो.
गुप्तहेरः जर तू इथे आला नाहीस आणि मीही तिथे गेलो नाही तर मग मोठ्या पावलांचे ठसे इथे कसे काय आले... मोठ्या पावलांच्या ठश्यांकडे बोट दाखवित केवळ एकाच जागेवर ते आहेत दुसरीकडे कुठेच नाही?
तंत्रज्ञः स्त्रीया असे दिसून येते की त्या काहीतरी घेवून जात होत्या.
गुप्तहेरः होय परंतू इतकं मोठं काही नाही, त्या हया बाटल्या व कापडांसारखे काही घेवून गेल्या.
तंत्रज्ञः धावणा-या माणसांनी एवढे मोठे काही नेले नसेल.
गुप्तहेरः मला काही समजत नाही. माझ्याकडे अनवाणी असे मोठे ठसे आहेत जे कबरेतून बाहेर निघाले आत आले नाही. धावणा-या माणसांचे ठसे, बूटांचे ठसे, आणि मग ते मोठे ठसे जे दुसरीकडे कुठेच दिसत नाहीत आणि त्या मोठया खडकाकडे जातात.
तंत्रज्ञः कदाचीत काल रात्री भूमीकंप झाला असावा. परंतू बाग मात्र चांगली ठेवलेली दिसते.
गुप्तहेरः तू आता काय म्हटले?
तंत्रज्ञः बाग चांगली ठेवलेली दिसते?
गुप्तहेरः नाही त्या आधी....

## नाटक 3

निवेदकःही काल्पनिक कथा आहे परंतू काही नाव व जागेची नावे जे निष्पाप त्यांच्या सुरक्षिततेसाठी बदलण्यात आले आहेत.
जहाजाचा मुख्यः मला रिपोर्टची फाइल हवी आहे.
तटरक्षकः ठीक आहे, इथ अनैसर्गिक घटनांचा तपशील असलेले तक्ते आहेत. तुला कोणत्याची गजर आहे?
जहाजाचा मुख्यः बाहेर पडलेला मनुष्य.
तटरक्षकः तुम्हाला तो सापडला का?
जहाजाचा मुख्यः नाही सर आम्हाला तो सापडला नाही.
तटरक्षकः वातावरण कसे होत? तुम्ही भयंकर वादळात सापडले होते का?
जहाजाचा मुख्यः होय सर, जवळ जवळ आम्ही सर्वच बुडणार होतो.
तटरक्षकः ठीक आहे तुम्ही सामान सुध्दा गमावले का? जर तुम्ही सामान व व्यक्ति गमाविल्या तर तुम्ही हा तक्ता भरा.
जहाजाचा मुख्यः तो प्रवासी होता.
तटरक्षकः बरं, तुम्हाला हा ज्यास्तीचा तक्ता भरावा लागेल जेणे करून तुम्ही त्याच्या कुटुंबाला कळवू शकाल, त्याला काही वयैक्तिक त्रास होता का?
जहाजाचा मुख्यः सर मला नक्की माहीत नाही, तो तर मरण पावला आहे.
तटरक्षकः तुम्ही त्या भयंकर वादळात त्याला समुद्रत गमाविले नाही का?
जहाजाचा मुख्यः होय परंतू जवळ जवळ वादळ संपत आल्यावर.
तटरक्षकः तुम्ही त्याला शोधण्यासाठी परत जाण्याचा प्रयत्न केला का?
जहाजाचा मुख्यः पण आम्ही त्याच्याकडे पोहचण्याआधीच तो गायब झाला....

## नाटक 4

निवेदकः ही काल्पनिक कथा आहे परंतू काही नाव व जागेची नावे जे निष्पाप त्यांच्या सुरक्षिततेसाठी बदलण्यात आले आहेत.
पोलिसः सर मी व माझा सहकारी तुम्हाला काही प्रश्न विचारू इच्छितो.
पादचारीः निश्चीत अधिकारी, कशा संबंधाने?
पोलिसः आम्हाला महामार्गावर कोणीतरी मरून पळाल्याची तक्रार मिळाली आहे.
पादचारीः अरे बापरे म्हणूनच मी कधी महामार्गावर एकटा प्रवास करीत नाही. तुम्ही पोलस अधिकारी फार दुर पसरलेले असता, आणि महामार्गावर लुटारूचे राज्य आहे.
पोलिसः (सहकार्याकडे पाहत) मी लुटारूसंबंधी काही म्हटले नाही, तू म्हटले का?
पोलिस 2: नाही मी नक्कीच काही म्हटले नाही.
पोलिसः तुम्हाला कसे माहीत की ते लुटारू होते. तुम्ही काल रात्री कुठेहोते हे तुम्ही सांगू शकता का.
पादचारीः शांत व्हा, काल रात्री मी जवळच्या आश्रय शहरात माझ्या कुटुंबाची भेट घेत होतो रात्री मी चालत होतो जेणे करून मी आज सकाळी कामावर जाऊ शकेल.
पोलिसः अच्छा तर काल रात्री तुम्ही महामार्गावर होता तर?
पादचारीः होय सर.
पोलिसः तुम्ही 180 सेमीचा उंच, मध्यम बांध्याचा घाणेरडा मनुष्य रस्त्याच्या कडेला मार खाल्लेला तुम्ही पाहीला का?
पादचारीः नाही, पण कदाचीत मी काहीतरी पाहिले असेल परंतू मी त्याच्याकडे नीट असे पाहीले नाही.
पोलिस 2: (वही काढून नोंद करतो)
पोलिसः तुम्ही त्याला पाहिले नाही कि तुम्हाला त्याला पाहायचे नव्हते?
पादचारीः पहा मला तयार व्हायचे आहे, मला कामावर बोलावण्यात आले आहे मी हयात पडू शकत नाही. जर त्यांनी मला सेवेसाठी हाक मारली तर? कोणास ठाऊक ते पुन्हा मला केव्हा बोलावितील.
पोलिस 2: हा हा हा. त्याला मदत करण्याची इच्छा नव्हती कारण त्याला सेवेसाठी बोलाविण्यात आले होते. हा हा, किती मजेशीर आहे की तुम्हाला बोलाविण्यात आले?
पादचारीः त्याकडे लक्ष देवू नका ते महत्वाचे नाही.
पोलिसः बस मला एवढेच प्रश्न होते. जर गरज पडली तर मी तुम्हाला बोलावू शकतो का?
पादचारीः कधीही, मला आनंद होईल.
पोलिस 2: (पादचा-याकडे अविश्वासाने पाहतो)

## नाटक 5

निवेदकः ही काल्पनिक कथा आहे परंतू काही नाव व जागेची नावे जे निष्पाप त्यांच्या सुरक्षिततेसाठी बदलण्यात आले आहेत.
पोलिसः एक मिनिट मॅडम?
मॅडमः काय साहेब?
पोलिसः मला तुम्हाला काही प्रश्न विचाराचे आहेत.
मॅडमः तुमच्या सारख्या देखन्या अधिका-यासाठी मी काहीही करील.
पोलिसः हं होय, मी विचार करत होतो की दुस-या घोषणेच्या आधिच्या रात्री तुम्ही काही पाहीले का?
मॅडमः म्हणजे तुम्ही रस्त्याच्या पलिकडे झेरेश व तीच्या गरीब पती संबंधी बोलत आहात का?
पोलिसः तेच.
मॅडमः ते विचित्र होते कारण पूर्ण आठवडाभर त्यांच्या अंगणात काम करण्यासाठी कामकरी होते.
पोलिसः पूढे सांगत राहा. वही काढून लिहू लागतो.
मॅडमः पहा, मला हे आत्महत्येसारखे वाटते, परंतू जर तुम्ही मला विचारले तर मला ते विचित्र वाटते.सर्व गोष्टी बद्दल काही तरी चूकत आहे.
पोलिसः म्हणजे तुम्हाला वाटत नाही की ती आत्महत्या आहे?
मॅडमः मला वाटते हे फारच विचित्र आहे.इतका वाईट मनुष्य, मला वाटते की तो आता माझा प्रश्न नाही, परंतू तो नक्कीच दुस-या कोणा तरी साठी युक्ती करत होता, परंतू त्या दिवशी मी ऐकले की तो सर्व शहर भर हे सांगत फिरत होता की तो चांगला व्यक्ति आहे.... आणि अचानक माझा शेजारी त्या फासावर लटकलेला होता!

# नाटक 6

निवेदकः ही काल्पनिक कथा आहे परंतू काही नाव व जागेची नावे जे निष्पाप त्यांच्या सुरक्षिततेसाठी बदलण्यात आले आहेत.
कचरा उचलणाराः (मोबाइलवर बोलत) हलो नेणारे? मला एक तक्रार करायची आहे.
कचरा नेणाराः (कंटाळलेल्या आवाजात) काय आहे कचरा उचलणा-या?
कचरा उचलणाराः तुम्हाला पुन्हा त्रास देत आहे म्हणून क्षमस्व, परंतू हे खूप घाण आहे. काहीतरी केले गेले पाहीजे.
कचरा नेणाराः कशा संबंधी काही तरी केले पाहिजे?
कचरा उचलणारः हया ठिकाणी सर्वत्र वापरलेल्या पट्टया पडलेल्या दिसत आहेत.
कचरा नेणाराः प्लास्टिकचे हात मोजे घाल व ते उचलून टाक.
कचरा उचलणाराः तुला समजत नाही आहे, त्या सर्वत्र पसरलेल्या आहेत, असे वाटते की जणू इथे डझन भर घाणरडे लोक असतील ज्यांनी त्यांच्या घाणेरडया पट्टया इथे बदलल्या. फारच किळसवाणे ते आहे.
कचरा नेणाराः बरं तू कुठे आहेस?
कचरा उचलणारः यरूशलेमच्या रस्यावर च्या गावजवळ पश्चिमेकडे.
कचरा नेणाराः बरे ऑफिसर “जो” हे डयूटीवर आहेत, मी त्यांना शहरात आलेल्या लोकसमुदायावर त्यांचा रिर्पोट झाला की तिथे यायला लावतो.
कचरा उचलणारः ऑफिसर “जो” नाही ते मला अजीबात मदत करणार नाहीत.
कचरा नेणाराः सध्या ते डयूटीवर आहेत, जर तुला 2 तास डयूटी बदलण्याची वाट पाहायची असेल तर थांब.
कचरा उचलणाराः हरत नाही मी हा कचरा स्वतःच उचलतो व स्वच्छ करतो.

# नाटक 7

निवेदकःही काल्पनिक कथा आहे परंतू काही नाव व जागेची नावे जे निष्पाप, त्यांच्या सुरक्षिततेसाठी बदलण्यात आले आहेत.
पोड़: पंजोबा?
पंजोबाः काय तरूणा?
पोड़: तुम्ही मला माझ्या शाळेच्या तपास गृहपाठात मदत करू शकता का?
पंजोबाः होय, मी हे बीज पेरत असतांना माझ्या बाजूने चालत राहा, मला आज संध्याकाळ पर्यंत हया बिया पेरायच्या आहेत म्हणजे मी उदया मागे राहणार नाही. त्याच्या कापळावरील घाण पुसतो.
पोड़: उत्तम! मी सर्वात उत्तम तपास करणार आहे. मी माझ्या परिचायातील सर्वात वयस्कर व्यक्तिच्या सर्वात जुन्या आठवणीबद्दल तपास करत आहे.
पंजोबाः तु त्याच्यासाठी माझी निवड केली नाही का?
पोड़: होय नक्कीच, तर मग तुम्ही मला हया डोंगरांबद्दल सांगू शकता का, ते इथे कसे आले?
पंजोबाः मी म्हातारा असेल परंतू मी माती पेक्षा जुना नाही.
पोड़: बरं, नदीबद्दल काही?
पंजोबाः त्या नदीत येणारे ओहळ मी एकदा पाहीले होते परंतू त्यांनतर मी कधी तिथे परत गेलो नाही.
पोड़: तर मग तुम्हाला आठवत असलेली सर्वात जुनी गोष्ट कोणती?
पंजोबाः प्राणी. माझी नवरी आणि मी सकाळी नाश्ता करत असतांना त्यांना पाहत असू आणि मी म्हणायचो पहा ते किती सुंदर आहे, आणि ती विचारायची कोणतं ते मोठा कथ्थ्या रंगांचे कि त्याच्यावरचे लाला रंगाचे? नंतर मग आम्ही विचार केला आम्ही फक्त आमच्या नाश्त्याचा आनंद घेवू आणि ते करीत असतांना प्राणी व ते करीत असलेल्या मजेदार गोष्टी पाहत राहू.
पोड़: खरंच ते किती छान वाटत असेल.
पंजोबाः होय ते छान होते. परंतू कोणस ठाऊक कदाचीत तुला किंवा तुझ्या मुलांना त्यांना असे एकत्रित पाहत येईल.
पोड़: ते फारच चांगले होईल.

# नाटक 8

निवेदकःही काल्पनिक कथा आहे परंतू काही नाव व जागेची नावे जे निष्पाप, त्यांच्या सुरक्षिततेसाठी बदलण्यात आले आहेत.
डॉक्टर: हलो सुरक्षा कर्मी मी जॉनला तपासण्यासाठी परत आलो आहे.
मुख्य द्वार पाळ: ओह! ते गरजेचे नाही.
डॉक्टर: तूझे म्हणणे काय आहे? मी त्या झोपून राहण्याचे कडक निर्देश दिले होते मला माहीत होते की त्याला रात्री त्रास होईल. म्हणून मी त्याला पाहण्यासाठी आलो आहे.
द्वारपाळः तुमचे काम या पासून जा मध्ये बदलण्यात आले आहे.
डॉक्टर: हे फार विलषण आहे. जॉन मरण पावला की थोडा बरा झाला?
द्वारपाळः मला माहीत नाही कालच्या माझ्या कागदावर काही माहीती दिसत नाही, मला फक्त एवढे दिसत आहे की तुमचे काम या पासून जा मध्ये बदलण्यात आले आहे.
डॉक्टर: हे विचित्र आहे, प्रौढ परत आले का? मला त्यांच्याशी बोलायचे आहे.
द्वारपाळः हो ते आले आहेत परंतू मला वाटते की ते तुमची फारशी मदत करू शकणार नाही.
डॉक्टर: ते का? मला वाटले ते काही मदत घेण्यासाठी गेले आहेत.
द्वारपाळः ते गेले परंतू मालक तिथे गेले आणि त्यांनी त्यांना सांगितले परत येऊ नका. काय झाले मला माहित नाही परंतू जेव्हा मालक गेले होते तेव्हा त्यांनी तुमच्या संबंधीचा निर्णय बदलला.
डॉक्टर: मी तुमच्या मालका बरोबर बोलू शकतो का?
द्वारपाळः नाही, जर ते तुम्हाला जा म्हणत आहेत तरी तुम्ही येऊ इच्छिता का?
डॉक्टर: नाही मी नाही येऊ इच्छित नाही, वेळ दिल्या बद्दल आभारी आहे.

# नाटक 9

निवेदकःही काल्पनिक कथा आहे परंतू काही नाव व जागेची नावे जे निष्पाप, त्यांच्या सुरक्षिततेसाठी बदलण्यात आले आहेत.
इन्स्पेक्टरः दार ठोकतो, शुभ सकाळ, मी आरोग्य विभागातून आलो आहे, मला तुम्हाला काही प्रश्न विचारायचे आहेत.
जूडासः दार उघडतो, बोला इन्स्पेक्टर.
इन्स्पेक्टरः मला सूचना मिळाली आहे की इथे अरोग्यासंबंध काही समस्या होती. तुम्ही इथे इलाज करता का?
जूडासः नाही सर.
इन्स्पेक्टरः प्रवाश्यासोबतचा तुमचा संबंध तुम्ही वर्णन कराल का?
जूडासः तो माझ्या कडे त्याच्या सोबत्यांबरोबर आला.
इन्स्पेक्टरः तुम्ही त्यांना काही विशेष जेवण दिले का?
जूडासः त्याच्या गटातील लोकांनी भरपूर जेवण केले परंतू मला नाही वाटत की मी त्याला काही खातांना पाहिले. तो बराच वेळ प्रार्थनेत घालवित होता.
इन्स्पेक्टरः तुम्ही त्याला नीट पाहीले का?
जूडासः खरं तर नाही मी त्याला मदत करू का असे विचारत राहीलो, मी त्याला डाक्टरला बोलावू का असेही विचारले परंतू त्याने मला तसे करू दिले नाही. तो कोणाची तरी वाट पाहत होता.

# नाटक 9

इन्स्पेक्टरः मग त्याने त्याच्या सोबत्यांपैकी कोणाला त्यांना घेण्यासाठी पाठविले का?
जूडासः नाही खरं तर ते कोणाशी बोलले नाही. ते आले प्रार्थना केली आणि वाट पाहत होते.
इन्स्पेक्टरः मग काय झाले?
जूडासः काही दिवसांनी कोणीतरी आले, त्याला स्पर्श केला त्याला काहीतरी सांगितले व त्याला घूतले व निघून गेला.
इन्स्पेक्टरः तो डॉक्टर होता का?
जूडासः नाही नाही.
इन्स्पेक्टरः ते मित्र होते का?
जूडासः खरं तर मला वाटले की ते शत्रू आहेत, परंतू ते मित्रांसारखे वागत नव्हते. हया सर्व गोष्टींनी मी भ्रमांत पडलो होतो.
इन्स्पेक्टरः बरं तुमच्या मदतीबद्दल आभारी आहे. जर मला आणखी प्रश्न विचारायचे असतील तर मी तुम्हाला कुठे भेटू शकतो?
जूडासः मी सरळ रस्त्यावरील माझ्या घरी राहील.

# नाटक

निवेदकः:ही काल्पनिक कथा आहे परंतू काही नाव व जागेची नावे जे निष्पाप त्यांच्या सुरक्षिततेसाठी बदलण्यात आले आहेत.
ऑपपरेटरः आक्समित सेवा, तुमची आणीबाणी कशा बद्दल आहे.
कॉलर मला जिवे मारण्याची धमकी मिळाली आहे.
ऑपपरेटरः हे कधी झाले.
कॉलरः काल रात्री, ती माझ्या भावाकडून माझ्या वडीलांना देण्यात आली.
ऑपरेटरः बरं मला असं वाटते की तुमच्या भावाने तुम्हाला मारण्याची धमकी दिली बरोबर?
कॉलरः नाही तसे नाही.
ऑपरेटरः म्हणजे तो तुमच भाऊ नाही तर?
कॉलरः नाही तसे नाही मला दुसरं काही म्हणायचे होते. तो मला नक्की मारणार नाही आहे.
ऑपरेटरः बरं म्हणजे तुमचा भाऊ नसलेला व्यक्ति तुम्हाला मारणार नाही तर.
कॉलरः होय हे बरोबर आहे.
ऑपरेटरः मग मला खात्री नाही की इथे सांगण्यासारखी आपतकालीन स्थीती आहे.
कॉलरः तो म्हणतो की देव मला व माझ्या भावाला एकाच दिवशी मारणार आहे.
ऑपरेटरः देव तुम्हाला एकाच दिवशी मरू देणार आहे?
कॉलरः होय ते बरोबर आहे.
ऑपरेटरः एक मिनीट, मला तुमचा आवाज ओळखीचा वाटतो, मला वाटतं तुम्ही ते पाळक आहात जे नेहमी स्टेक खातात?
कॉलरः नाही तुम्ही माझ्या भावाचा विचार करत आहात त्याला फासळया आवडतात.
ऑपरेटरः पहा मला ज्यास्त कडक बोलायचे नाही परंतू मी तो चूकीचा वागतो असे कधी ऐकले नाही. आणि जर तुम्ही देवा विरूध्द पाप करता तर तुम्हाला कोण मदत करेल?
कॉलरः ओह! हे कडक बोलणे आहे. तुम्ही एखादया ऑफिसरला पाठविणार आहात का?
ऑपरेटरः क्षमा असावी तुम्हाला मदत करण्यासाठी आम्ही काही करू शकत नाही. तुम्ही तुमच्या वडीलांशी बोला आणि पहा की ते तुम्हाला काही मदत करू शकतात का.
कॉलरः तरी सुध्दा मी तुमचा आभारी आहे.

## नाटक

निवेदकःही काल्पनिक कथा आहे परंतू काही नाव व जागेची नावे जे निष्पाप, त्यांच्या सुरक्षिततेसाठी बदलण्यात आले आहेत.
संदेशवाहकः मी परत आलो आहे.
मेरीः तो काय म्हणाला?
संदेशवाहकः तो म्हणाला त्याचा आजार मरणात संपणार नाही.
मेरीः रडणे सुरू करते.
संदेशवाहकः काय झाले?
मेरीः तो आधिच मरण पावला आहे.
संदेशवाहकः हे कसे शक्य आहे? तो आणखी एक दिवस येईल असे वाटत नव्हते.
मेरीः मला समजत नाही त्याने नक्की असे म्हटले का की तो मरणार नाही?
संदेशवाहकः मला परत पाहू दे(कागद काढून वाचतो) हो तो असेच म्हणाला. की तो त्या आजाराने मरणार नाही.
मेरीः मला ते वाचू दे.(ती ते वाचते)
संदेशवाहकः तुमच्या दुःखा बद्दल मला दुःख आहे.
मेरीः तो येईल असे म्हणाला का?
संदेशवाहकः होय.
मेरीः तो इथे आल्यावर मला त्याच्या बरोबर बोलावे लागेल कारण मला काही समजत नाही आहे.
संदेशवाहकः आणखी काही आहे का?
मेरीः मला प्रेतक्रियेची तयार सुरू करावी लागेल. तू फूलवाल्याकडे जाऊन फूलं आणू शकतोस का? आणि मला इथेही तुझी मदत लागेल.
संदेशवाहकः नक्की.

## नाटक

निवेदकःही काल्पनिक कथा आहे परंतू काही नाव व जागेची नावे जे निष्पाप, त्यांच्या सुरक्षिततेसाठी बदलण्यात आले आहेत.
द्वारपाळः नमस्कार ऑफिसर मी आज तुमची कशी मदत करू शकतो?
तपासकः नमस्कार, (बिल्ला काढून खिश्यात टाकतो) मी तुम्हाला काही प्रश्न विचारू शकतो का?
द्वारपाळः होय नक्कीच.
तपासकः मला समजले की हया इमारतीत आज दोन खून झाले आहे.
द्वारपाळः नाही सर, मी म्हणेन की त्या आत्महत्या होत्या.
तपासकः तुम्ही त्याला आत्महत्या का म्हणाल? मला लिहिलेली चिठ्ठी दिसत नाही यावरून ती आत्महत्या नसावी.
द्वारपाळः त्यांनी भूलवणूक करण्याचा प्रयत्न केला व ते त्यापासून चूकले व त्यामूळे त्यांचेच मरण झाले.
तपासकः तुम्ही कुठे होता?
द्वारपाळः नेहमीप्रमाणे माझे पाय हया दरातच होते.
तपासकः हया नाटयात तुमची काही भूमिका होती का?
द्वारपाळः होय सर मी त्या खोलीतून शव बाहेर काढून त्या व्यक्तिला दिले जिने ते शव गृहात नेले.
तपासकः अच्छा तर तुम्ही शव पाहिले तर?
द्वारपाळः होय सर एक स्त्री व एक पुरूष होते.
तपासकः जेव्हा तुम्ही त्याला नेले तेव्हा त्यांच्या अंगावर कापलेले किंवा लागलेले काही चिन्ह होते का?
द्वारपाळः नाही ते अत्यंत निरोगी दिसत होते फक्त ते मेलेले होते.
तपासकः मला वाटते की बाहेर पाहून आत काय होत आहे हयाचा आपण अंदाज लावू शकत नाही.
द्वारपाळः तुम्ही हे म्हणावे हे हस्यास्पद आहे, असे त्यांना वाटले. परंतू मी तुम्हाला सांगतो हया खोलीत खोटे बोलणारे नाहीत.

## नाटक

तपासाकः तू काय म्हणालास?
द्वारपाळः इथे खोटे बोलणारे नाहीत.
तपासकः नाही त्या आधी.
द्वारपाळः आत काय होत होते ते कोणी पाहू शकत नव्हते.

## नाटक

निवेदकःही काल्पनिक कथा आहे परंतू काही नाव व जागेची नावे जे निष्पाप, त्यांच्या सुरक्षिततेसाठी बदलण्यात आले आहेत.
भटकणाराः तू काय शोधत आहेस?
खासगी तपासकः मी एका तरूण मुलाचे गायब होण्याच्या घटनेचा तपास करीत आहे तो अंदाजे इतका उंच होता. तो अशा प्रकारचा झागा घातलेला असावा.
भटकणाराः होय मी त्याला काही दिवसाआधी पाहीले होते.
खासगी तपासकः तो कुठे जात होता ते माहीत आहे का?
भटकणाराः मला वाटते तो दोथानला जात असावा.
खासगी तपासकः दोथानला का?
भटकणाराः मी त्याच्या भावांना तिथे जाण्याबद्दल बोलतांना ऐकले, म्हणून जेव्हा तो त्यांना शोधत इथे आला तेव्हा मी त्यालासांगितले की ते तिथे जात आहेत.
खासगी तपासकः तुम्ही आणखी काही ऐकले का?
भटकणाराः होय मी जर त्यांचा भाऊ असतो तर मी त्यांच्या जवळ गेलो सुध्दा नसतो. ते त्याच्यावर खूपच रागवलेले होते.
खासगी तपासकः मनांरजक तू ऐकले का की ते का रागावले होते?
भटकणाराः असे दिसते की त्याने त्यांच्या वाईट वागणूकीची तक्रार त्याच्यांचा वडीलांना केली होती आणि मग ते हळू आवाजात बोलत होते जे मला नीट ऐकू आले नाही.
खासगी तपासकः तू ते ऐकले नाही कि ते ऐकण्याची तुला इच्छा नव्हती?
भटकणाराः मी थोडं थोडं ऐकले परंतू मला ते समजले नाही सर्व भाऊ त्या बद्दल उत्साही होते. डॉन त्याबद्दल खूप आवेशी होता, परंतू बेन मला वाटते ते त्याचे नाव होते तो त्याबद्दल स्थीर होता.
खासगी तपासकः आणि तुम्ही त्याला सांगितले की त्याचे भाऊ कुठे गेले?
भटकणाराः मला वाटले की तो दोथानला पोहचे पर्यत ते शांत झाले असतील व तो सुरक्षित राहील.
खासगी तपासकः मला त्याबद्दल खात्री नाही.
भटकणाराः का काही घडले का?
खासगी तपासकः होय तो हरवला आहे व तो आता पर्यंत मेला असेल असे वाटते. त्याच्या वडीलांनी तो हरवण्याआधी काय झाले ते पाहण्यासाठी व त्यांचे काही उरले असल्यास ते गोळा करण्यासाठी पाठविले आहे.
भटकणाराः हे देवा, बिचारा मुलगा तो हरवला आहे असे दिसते. मी त्याला मदत करण्याचा प्रयत्न केला मला काही माहीत नव्हते!

**www.childrenareimportant.com**
info@ChildrenAreImportant.com
WhatsApp: +1 (971) 328-2783